# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,

17, डॉ.आंबेडकर मार्ग, लाल देवळाजवळ, पुणे-01

Phone No. - 020-26123066/67 Email: msce.kpexam2023@gmail.com Website: www.mscepune.in


**जा.क्र. मरापप/बापवि/२०२३/ ३५०४** **दिनांक : ०५/०६/२०२३**

१. महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्हा परिषदेमधील प्राथमिक शिक्षकांना केंद्रप्रमुख पदावर विभागीय मर्यादित स्पर्धा परीक्षेव्दारे निवडीव्दारे नियुक्ती देण्यासाठी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत माहे जून २०२३ च्या शेवटच्या आठवडयामध्ये **'केंद्रप्रमुख विभागीय मर्यादित स्पर्धा परीक्षा - २०२३'** चे महाराष्ट्र राज्यातील विविध केंद्रांवर आयोजित करण्यात येत आहे.

**२. प्रस्तुत परीक्षेमधून भरावयाच्या पदांचा व इतर तपशील खालील प्रमाणे आहे.**

२.१ वेतन श्रेणी :- एस १५ : ४१८०० - १३२३००

२.२ पदसंख्या :-

| अ.क्र. | जिल्हा | शासन निर्णय दि. १/१२/२०२२ नुसार विभागीय स्पर्धा परीक्षेव्दारे पदभरती करिता उपलब्ध पदे | अ.क्र. | जिल्हा | शासन निर्णय दि. १/१२/२०२२ नुसार विभागीय स्पर्धा परीक्षेव्दारे पदभरती करिता उपलब्ध पदे |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | १ | २ | ३ |
| १ | नाशिक | १२२ | १८ | परभणी | ४३ |
| २ | नंदुरबार | ३३ | १९ | जालना | ५३ |
| ३ | धुळे | ४० | २० | बीड | ७८ |
| ४ | जळगांव | ८० | २१ | लातूर | ५० |
| ५ | अमरावती | ६९ | २२ | उस्मानाबाद | ४० |
| ६ | बुलढाणा | ६५ | २३ | नांदेड | ८७ |
| ७ | अकोला | ४२ | २४ | ठाणे | ४७ |
| ८ | वाशिम | ३५ | २५ | रायगड | ११४ |
| ९ | यवतमाळ | ९० | २६ | पालघर | ७५ |
| १० | नागपूर | ६८ | २७ | पुणे | १५३ |
| ११ | वर्धा | ४३ | २८ | अहमदनगर | १२३ |
| १२ | भंडारा | ३० | २९ | सोलापूर | ९९ |
| १३ | गोंदिया | ४२ | ३० | कोल्हापूर | ८५ |
| १४ | गडचिरोली | ५० | ३१ | सांगली | ६७ |
| १५ | चंद्रपूर | ६६ | ३२ | सातारा | १११ |
| १६ | औरंगाबाद | ६४ | ३३ | रत्नागिरी | १२५ |
| १७ | हिंगोली | ३४ | ३४ | सिंधुदूर्ग | ६१ |

२.३ वर नमुद पदसंख्येमध्ये बदल होण्याची शक्यता आहे.

२.४ शासन निर्णय दि. ०१/१२/२०२२ नुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद हे त्यांच्या जिल्हयातील उर्दु शाळांची संख्या विचारात घेवून उर्दु माध्यमासाठी केंद्र प्रमुखाची पदे निश्चित करतील

**३. पात्रता :**

३.१ फक्त संबंधित जिल्हा परिषद मधील शाळेवर कार्यरत पात्र शिक्षक सदर परीक्षेसाठी अर्ज करण्यास पात्र आहेत. संबंधित जिल्हा परिषदे व्यतिरिक्त जसे अन्य जिल्हा परिषद, न.प. / न. पा., म.न.पा., खाजगी संस्था मधील शिक्षक कर्मचारी प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज करण्यास पात्र नाहीत.

३.२ जाहिरातीस अनुसरून निश्चित करण्यात आलेल्या अर्ज स्विकारण्याच्या अंतिम दिनांकास उमेदवाराने कोणत्याही मान्यता प्राप्त विद्यापिठाची बी.ए. / बी.कॉम./ बी.एस.सी. ही पदवी किमान ५० टक्के गुणांसह उत्तीर्ण होणे आवश्यक आहे आणि जिल्हा परिषदेच्या प्रशिक्षित पदवीधर (प्राथमिक) या पदावर तीन वर्षापेक्षा कमी नाही इतकी अखंड नियमित सेवा (शिक्षण सेवक कालावधी वगळून) पूर्ण करणे आवश्यक आहे.

**किंवा**

प्रशिक्षित शिक्षक (प्राथमिक) या पदावर नियुक्त शिक्षकांनी ज्या दिनांकास वरील प्रमाणे पदवी धारण केलेली आहे, त्या दिनांकापासून ३ वर्षापेक्षा कमी नाही इतकी अखंड नियमित सेवा (शिक्षण सेवक कालावधी वगळून) पूर्ण करणे आवश्यक आहे.

३.३ विभागीय मर्यादित स्पर्धा परीक्षेसाठी अर्ज करण्याच्या शेवटच्या दिनांकापर्यंत कमाल वयोमर्यादा ५० वर्ष राहील.

३.४ विभागीय मर्यादित स्पर्धा परीक्षेसाठी उमेदवार ज्या जिल्हा परिषदेमध्ये कार्यरत असेल, त्याच जिल्हयासाठी पात्र राहतील.

**४. आरक्षण संदर्भात सर्वसाधारण तरतूदी**

४.१ दिव्यांग आरक्षण :-

४.१.१ दिव्यांग हक्क अधिनियम २०१६ च्या आधारे शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्र. दिव्यांग २०१८/प्र.क्र. ११४/१६ अ, दिनांक २९/०५/२०१९ तसेच या संदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार दिव्यांग व्यक्तीच्या आरक्षणासंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

४.१.२ दिव्यांग व्यक्तीची संबंधित संवर्ग / पदांकरीता पात्रता शासनाकडून वेळो वेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

४.१.३ संबंधित दिव्यांगत्वाच्या प्रकाराचे किमान ४० टक्के दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र धारक उमेदवार/ व्यक्ती आरक्षण तसेच नियमानुसार अनुज्ञेय सोयी / सवलतीसाठी पात्र असतील.

४.१.४ दिव्यांग व्यक्तीसाठी असलेल्या कोणत्याही प्रकारचा फायदा घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांनी शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक अप्रक्रि - २०१८/प्र.क्र.४६/आरोग्य - ६, दि.१४/०९/२०१८ मधील आदेशानुसार केंद्रशासनाच्या www.swavlambancard.gov.in अथवा SADM या संगणकीय प्रणालीव्दारे वितरित करण्यात आलेले नवीन नमुन्यातील दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

**५. परीक्षा योजना:-**

५.१ परीक्षेचे टप्पे:- एक - लेखी परीक्षा

५.२ परीक्षेचे स्वरूप:- वस्तुनिष्ठ बहुपर्यायी

५.३ प्रश्नपत्रिका:- एक

५.४ एकुण गुण:- २००

५.५ लेखी परीक्षेची योजना व सविस्तर अभ्यासक्रम: -

परीक्षेचे माध्यम मराठी व इंग्रजी असेल. परीक्षेचे माध्यम गुणवत्तेसाठी विचारात घेतले जाणार नाही. सदर परीक्षा एकूण 200 गुणांची राहील व त्यासाठी दोन तासाचा कालावधी राहील. परीक्षेसाठी पुढीलप्रमाणे घटक व गुणांकन राहील:-

